नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३१९ | Issue - 319 | वार शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६ | Blow- Friday Date 10 April 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# मंदिरात प्रवेश नाकारल्यास समाजात फूट

## 'शबरीमला'वरुन सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी; विविध धर्मांमध्ये पाळल्या जाणाऱ्या धार्मिक स्वातंत्र्याच्या कक्षा आणि व्याप्तीवरही या सुनावणीत विचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: सर्वांना सर्व मंदिरे आणि मठांमध्ये प्रवेश मिळायला हवा. एखाद्या पंथाला वगळल्यास त्याचा हिंदू धर्मावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो आणि समाजात फूट पडू शकते, अशी भीती सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी व्यक्त केली.

विविध धर्मांमध्ये पाळल्या जाणाऱ्या धार्मिक स्वातंत्र्याच्या कक्षा आणि व्याप्तीवरही या सुनावणीत विचार झाला. या घटनापीठात सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्यासह न्या. बी. व्ही. नागरत्ना, एम. एम. सुंद्रेश, अहसानुद्दीन अमानुल्लाह, अरविंद कुमार, ऑगस्टिन जॉर्ज मसिह, प्रसन्न बी. वराळे, आर. महादेवन आणि जॉयमल्या बागची या न्यायमूर्तींचा समावेश आहे.

पंथाधारित मंदिरांना केवळ त्या पंथापुरतेच पूजाअर्चेचे अधिकार मर्यादित ठेवण्याचा अधिकार असल्याचा युक्तिवाद वरिष्ठ वकील सी. एस. वैद्यनाथन यांनी केला. ते नायर सर्व्हिस सोसायटी, अय्यप्पा सेवा समाजम आणि क्षेत्र संरक्षण समिती आदी संस्थांच्या वतीने बाजू मांडत होते.

यावर न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या, 'एक भीती आहे. जसे वेंकटरमणा देवरू प्रकरणात गौड सारस्वत ब्राह्मणांखेरीज इतरांना वगळण्यात आले होते, त्याप्रमाणे जर प्रवेश नाकारला, तर त्याचा हिंदू धर्मावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.' प्रत्येकाला प्रत्येक मंदिर आणि मठात प्रवेश मिळायला हवा. शबरीमला प्रकरणातील वाद बाजूला ठेवा; पण जर तुम्ही म्हणत असाल, की ही प्रथा आहे आणि हा धर्माचा विषय आहे, की मी इतरांना वगळेन, तर ते हिंदू धर्मासाठी चांगले नाही,' असे नागरत्ना यांनी नमूद केले. न्या. कुमार यांनीही याला दुजोरा देत अशा बहिष्काराने समाजात फूट पडेल, अशी भीती व्यक्त केली.

केरळमधील शबरीमला मंदिरात मासिक पाळीच्या वयोगटातील महिलांच्या प्रवेशावर असलेली मर्यादा योग्य असल्याचे केंद्र सरकारने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात सांगितले. २०१८ मधील सर्वोच्च न्यायालयाचा निकाल पुरुष श्रेष्ठ आणि महिला कनिष्ठ दर्जाच्या आहेत, या गृहितकावर आधारित आहे, असे केंद्र सरकारकडून मांडण्यात आले. काही ठिकाणी पुरुषांनाही मंदिरप्रवेश नसल्याची उदाहरणे केंद्रातर्फे मांडण्यात आली. 'एक भीती आहे. जसे वेंकटरमणा देवरू प्रकरणात गौड सारस्वत ब्राह्मणांखेरीज इतरांना वगळण्यात आले होते, त्याप्रमाणे जर प्रवेशाचा अधिकार नाकारला, तर त्याचा हिंदू धर्मावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो,' असे न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या.



# बारामतीत शेवटच्या दिवशी काँग्रेससह ३० उमेदवारांचे अर्ज मागे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्याचं लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत अखेर काँग्रेसने आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला असून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अर्ज माघारी घेत असल्याची घोषणा केली. यावेळी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी फोन करुन विनंती केल्याची तसेच आमदार रोहित पवार यांनी देखील सकाळी सकाळीच भेट घेतल्याची माहिती दिली. तसेच, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी देखील सूचना केल्याचं उल्लेख करत सपकाळ यांनी काँग्रेसने निवडणुकीत माघार घेतल्याचं सांगितलं. यावेळी, त्यांनी पार्थ पवारांच्या वक्तव्यावरुन त्यांचे कान देखील टोचले.

बारामती पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ३० उमेदवारांनी आपले अर्ज माघारी घेतले आहेत. शेवटच्या दिवशी अर्ज माघारी घेण्याची वेळ संपली आहे. तत्पूर्वी, काँग्रेस उमेदवार आकाश मोरे यांनीही आपला अर्ज माघारी घेतला. त्यामुळे, बारामती विधानसभा मतदारसंघातील अर्ज दाखल केलेल्या ५३ पैकी एकूण ३० उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. मात्र, बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले आणि करुणा मुंडे-शर्मा यांचा अर्ज कायम आहेत. त्यामुळे, बारामती पोटनिवडणुकी एकूण २३ जण निवडणुकीच्या रिंगणात आहेत. दरम्यान, गुरुवारी सहा जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले होते, त्यानंतर आज २४ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले आहेत. त्यामुळे, एकूण, ३० उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले.

दरम्यान, बारामती पोटनिवडणुकीसाठी अभिजीत बिचुकले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता, तसेच करुणा शर्मा यांनी देखील अर्ज भरला होता. त्यामुळे, काँग्रेसने माघार घेतल्यानंतर या दोघांच्या अर्जाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी दोघेही बारामतीत फिरकलेच नाहीत. त्यामुळे, त्यांचे अर्ज कायम राहिले असून आता, पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार असल्याचं निश्चित झालं आहे.

बारामतीत २३ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांमध्ये होणाऱ्या पोटनिवडणुकांच्या प्रचारासाठी भाजपाच्या केंद्रीय कार्यालयाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. ही यादी निवडणूक आयुक्तांना सादर करण्यात आली आहे. या स्टार प्रचारकांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, नितीन गडकरी, शिव प्रकाश, चंद्रशेखर बावनकुळे, विनोद तावडे, अशोक चव्हाण, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील या बड्या नेत्यांची नावे आहेत.

# इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जहाज 'ग्रीन आशा' मुंबईत दाखल

मुंबई : इराण युद्धामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर भारतीय तेलवाहू जहाज 'ग्रीन आशा' आज म्हणजेच गुरुवार ९ एप्रिल रोजी मुंबईत दाखल झाले आहे. १५,००० टन एलपीजी घेऊन जाणारे हे जहाज मुंबईत आले आहे. या भारतीय जहाजाने होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून मुंबईत प्रवेश केला आहे.

इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यात दोन आठवड्यांसाठी शस्त्रसंधी जाहीर करण्यात आली आहे. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याची घोषणाही केली आहे. परिणामी, या काळात आणखी बरीच जहाजे भारतात येऊ शकतात.

'ग्रीन आशा' हे जहाज १५,४०० टन एलपीजी घेऊन नवी मुंबईतील जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जेएनपीए) येथे दाखल झाले आहे. जेएनपीएने म्हटले आहे की; भारतीय ध्वज असलेल्या 'ग्रीन आशा' या एलपीजी जहाजाचे स्वागत करण्यात आले. या जहाजाने होर्मुझची सामुद्रधुनी यशस्वीपणे पार करून बीपीसीएल-आयओसीएलद्वारे संचालित जेएनपीएच्या लिक्विड बर्थवर नांगर टाकला.

'ग्रीन आशा'चे आगमन महत्त्वपूर्ण आहे, कारण युद्ध सुरू झाल्यापासून होर्मुझची सामुद्रधुनी पार करून जेएनपीएमध्ये पोहोचणारे हे अशा प्रकारचे पहिलेच जहाज आहे. हे जहाज १५,४०० टन एलपीजी घेऊन आले आहे. प्राधिकरणाने म्हटले आहे, जहाज, त्यावरील माल आणि सर्व कर्मचारी सुरक्षित आहेत. हे आगमन गुंतागुंतीच्या भू-राजकीय परिस्थितीतही सागरी कारवायांची कार्यक्षमता दर्शवते आणि देशाला अत्यावश्यक एलपीजीचा अखंड पुरवठा सुनिश्चित करते.

दरम्यान इराणकडून होर्मुज सामुद्रधुनी संदर्भात एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. इराणने आता जहाजांच्या वाहतुकीसाठी पर्यायी समुद्री मार्गांची घोषणा केली आहे.

सामुद्रधुनीचे पर्यायी मार्ग :

प्रवेश मार्ग : ओमान समुद्रातून होर्मुज सामुद्रधुनीत प्रवेश करणारी जहाजे आता लारक बेटाच्या उत्तरेकडील भागातून प्रवास करतील. त्यानंतर ती पर्शियन आखाताच्या दिशेने पुढे जातील. संभाव्य धोक्यांपासून बचाव करत सुरक्षित प्रवेश मिळावा हा या मार्गाचा उद्देश आहे.

निर्गमन मार्ग : आखातातून बाहेर पडणाऱ्या जहाजांसाठीही नवीन मार्ग निश्चित करण्यात आला आहे. ही जहाजे लारक बेटाच्या दक्षिणेकडील भागातून ओमान समुद्राच्या दिशेने रवाना होतील.

इराणचे म्हणणे आहे की, या नव्या मार्गांचा उद्देश जहाजांना सुरक्षित आणि अखंड प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. जलमार्गात कोणतीही अप्रिय घटना टाळणे आणि आंतरराष्ट्रीय नौवहन सुरळीत ठेवणे, या दिशेने हा एक महत्त्वाचा उपक्रम असल्याचेही इराणने स्पष्ट केले आहे.

## अनंत माणुसकीच्या महोत्सवातून समाजाला नवी दिशा : पवार

## शिखर पहारिया फाउंडेशनने फुलविले हजारो चेहऱ्यावर हास्य

# उद्योगपती अनंत मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त महाउपक्रमांचा शुभारंभ उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सुप्रसिद्ध उद्योगपती अनंत मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त शिखर पहारिया फाउंडेशनच्या वतीने विविध १४ महाउपक्रमांद्वारे माणुसकीचा महोत्सव साजरा केला. उपस्थित हजारो महिला, विद्यार्थिनी, विद्यार्थी आणि नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविले. अनंत आनंदाचा शिधाने ५ हजार घरांची चूल उजळणार आहे.१४ ठिकाणी अन्न, शिक्षण, आरोग्य व स्वावलंबनाला मोठे बळ दिले.





प्रसिद्ध उद्योगपती अनंत मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त शिखर पहारिया फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ५ हजार गरजू कुटुंबांना अन्नधान्य किट वाटपसह शहर व जिल्ह्यात तब्बल १४ ठिकाणच्या विविध समाजोपयोगी महाउपक्रमांचा महाशुभारंभ कार्यक्रम गुरुवारी सोलापूर शहरातील जुनी मिल कंपाऊंडमधील मैदान येथे उत्साही वातावरणात पार पडला.

### अनंत आनंदाचा शिधाने उजळली ५ हजार घरांची पेटणार चूल; १४ ठिकाणी अन्न, शिक्षण, आरोग्य व स्वावलंबनाला दिले मोठे बळ

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे,

फाउंडेशनचे तन्वीर शेख, राज सलगर , धर्मराज गुंडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्ष कुंडीत पाणी देऊन पर्यावरणाचा संदेश दिला. त्यानंतर महाउपक्रमांचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार म्हणाल्या, शिखर पहारीया फाउंडेशनच्या वतीने प्रसिद्ध उद्योगपती अनंत अंबानी यांचा वाढदिवस महा उपक्रमाने साजरा केला. अनंत माणुसकीच्या महोत्सवातून समाजाला नवी दिशा या महाउपक्रमाने दिली आहे.आपण वाढदिवस साजरा करत नाही, तर माणुसकीचा उत्सव साजरा करत आहोत. अनंत अंबानी यांच्या प्रेरणेने समाजसेवेचा हा 'अनंत' प्रवास सुरू आहे.५ हजार कुटुंबांच्या चुली पेटवणे म्हणजे केवळ मदत नव्हे, तर आशेचा दिवा लावणे आहे असे सांगून फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले.

दिवसभरात सोलापूर शहर व जिल्ह्यात विविध १४ ठिकाणी हे उपक्रम राबवण्यात आले. जिल्ह्यातील २०० विद्यार्थिनींना सायकली, १ हजार विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले आहे. अनाथ आश्रमासाठी ५० बेड देण्यात येत असून, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड सोलापूर या संस्थेत १० डबल बेड, राठोड अनाथ आश्रमात ५ बेड, मोहोळ आश्रम शाळेत १५ बेड देण्यात आले. येथील श्री गेनसिद्ध मंदिर येथे ८ लाख रुपयांचे ५८.५ केव्हीए जनरेटर देण्यात आले. राणी लक्ष्मीबाई मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीग्रह मांजरेवाडी येथे आरओ प्लांट वॉटर मशीन भेट देण्यात आली. बोंबड्याला शाळेत डिजिटल ब्लॅक बोर्ड दिले. कुंभारी येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नगर येथे बोअर मारून सबमर्सिबल पंप सेट बसवून पाण्याची टाकी उपलब्ध केली.२०० महिलांना शिलाई मशीनचे वितरण करून त्यांना स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यास मदत केली.

### शिखर पहारीया फाउंडेशनने समाजसेवेचा मानदंड निर्माण केला : वीणा पवार

**शिखर पहारिया फाउंडेशनने अन्न, शिक्षण, आरोग्य व स्वावलंबनाचा आदर्श घालून दिला आहे. समाजसेवेचा मानदंड फाउंडेशनने निर्माण केला आहे. अशा उपक्रमांतून समाज अधिक संवेदनशील आणि सक्षम होतो. इतरांच्या आयुष्यात आनंद निर्माण करणारा हा महोत्सव ठरला आहे. हा उपक्रम प्रत्येकाच्या मनात सेवाभावाची ज्योत पेटवणारा आणि समाजाला दिशा देणारा आहे, असे महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार म्हणाल्या.**

शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी विविध १० शाळांमध्ये आरओ फिल्टर प्लांट बसविण्यात येत आहेत. तसेच शहर व जिल्ह्यातील शाळांना डिजिटल स्मार्ट बोर्ड देण्यात आले असून, १० शाळांमध्ये संगणक संच देऊन विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत या उद्देशाने ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेण्यात आले आहे.शाळांमध्ये स्मार्ट बोर्ड, संगणक संच आणि आरओ प्लांट बसवून आधुनिक शिक्षणाची दारे उघडली जात आहेत.याशिवाय सोलापुरात १०० ठिकाणी जनावरांसाठी पाण्याची सोय करण्यासाठी पाण्याची पात्रे बसविण्यात येत असून, त्याठिकाणी नियमित पाणी पुरवठाही केला जाणार आहे. वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या घरांसाठी तसेच मंदिरांसाठी १ हजार पत्र्यांचे वाटप करण्यात आले आहे. आरोग्य उपक्रम राबवून मोठा दिलासा देण्यात येणार असून आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या गरजू रुग्णांसाठी विविध प्रकारच्या १०० शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. एकाच दिवशी इतक्या व्यापक प्रमाणावर महाउपक्रम राबवून सोलापूर जिल्ह्यात माणुसकीचा महोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धर्मराज गुंडे यांनी केले. तन्वीर शेख यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर राज सलगर यांनी आभार मानले. नवनिर्मित सोलापूर जिल्हा रुग्णालयात ३८ लाखांचे वैद्यकीय साहित्य प्रदान करण्यात आले. या रुग्णालयाचे अतिरिक्त शल्यचकित्सक डॉ. चंद्रकांत क्षीरसागर , जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहन वायचळ, मेट्रन विजयमाला बेले यांच्यासह अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या वैद्यकीय साहित्य सामग्रीमुळे जिल्हा रुग्णालयात रुग्णांना चांगली आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध होणार आहे.

**शिखर पहारीया फाउंडेशनच्या या परिवाराने घेतले परिश्रम**

महा उपक्रमाच्या शुभारंभ कार्यक्रमाचे नेटके नियोजन करण्यात आले होते. आवश्यक ती सर्व सुविधा उपलब्ध केली होती. हा समारंभ यशस्वी पार पाडण्यासाठी फाउंडेशनचे तन्वीर शेख, राज सलगर, धर्मराज गुंडे, कौशल शिंदे, सूर्या शेट्टीयार, तुषार जोगदनकर, धीरज खंदारे, धीरज कारंडे , इब्रान शेख, महताब शेख, पवन इगवे, राहुल तलवार, हरीश जाधव, प्रकाश बगलोलू ,अजय भंडारे, कृष्ण भंडारे, गणेश आमटेपागुल, ओंकार नवले, राजेश शिंगे, संजय भरड यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### वाढदिवसानिमित्त उपक्रमाची ठळक वैशिष्ट्ये अशी

- सोलापूर शहर-जिल्ह्यात १४ ठिकाणी एकाच दिवशी उपक्रम
- ५ हजार कुटुंबांना अन्नधान्य किट वाटपाचा शुभारंभ
- शिक्षण, आरोग्य, पाणी व स्वावलंबनावर विशेष भर
- हजारो महिला, विद्यार्थिनी, विद्यार्थी आणि नागरिकांची उपस्थिती
- ३०० विद्यार्थी दत्तक , १ हजार बॅग, २०० मुलींना सायकली वाटप
- १०० मोफत शस्त्रक्रियाने गरीब रुग्णांना दिलासा
- २०० महिलांना शिलाई मशीन
- जिल्हा रुग्णालयात ३८ लाखांचे वैद्यकीय साहित्य

## संपादकीय....

### ‘सर्वोच्च’ निर्णय

सर्वांना सर्व मंदिरे आणि मठांमध्ये प्रवेश मिळायला हवा. एखाद्या पंथाला वगळल्यास त्याचा हिंदू धर्मावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो आणि समाजात फूट पडू शकते, अशी भीती सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी व्यक्त केली. विविध धर्मांमध्ये पाळल्या जाणाऱ्या धार्मिक स्वातंत्र्याच्या कक्षा आणि व्याप्तीवरही या सुनावणीत विचार झाला. या घटनापीठात सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्यासह न्या. बी. व्ही. नागरत्ना, एम. एम. सुंद्रेश, अहसानुद्दीन अमानुल्लाह, अरविंद कुमार, ऑगस्टिन जॉर्ज मसिह, प्रसन्न बी. वराळे, आर. महादेवन आणि जॉयमल्या बागची या न्यायमूर्तींचा समावेश आहे. पंथाधारित मंदिरांना केवळ त्या पंथापुरतेच पूजाअर्चेचे अधिकार मर्यादित ठेवण्याचा अधिकार असल्याचा युक्तिवाद वरिष्ठ वकील सी. एस. वैद्यनाथन यांनी केला. ते नायर सर्व्हिस सोसायटी, अय्यप्पा सेवा समाजम आणि क्षेत्र संरक्षण समिती आदी संस्थांच्या वतीने बाजू मांडत होते. यावर न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या, 'एक भीती आहे. जसे वेंकटरमणा देवरू प्रकरणात गौड सारस्वत ब्राह्मणांखेरीज इतरांना वगळण्यात आले होते, त्याप्रमाणे जर प्रवेश नाकारला, तर त्याचा हिंदू धर्मावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.' प्रत्येकाला प्रत्येक मंदिर आणि मठात प्रवेश मिळायला हवा. शबरीमला प्रकरणातील वाद बाजूला ठेवा; पण जर तुम्ही म्हणत असाल, की ही प्रथा आहे आणि हा धर्माचा विषय आहे, की मी इतरांना वगळेन, तर ते हिंदू धर्मासाठी चांगले नाही,' असे नागरत्ना यांनी नमूद केले. न्या. कुमार यांनीही याला दुजोरा देत अशा बहिष्काराने समाजात फूट पडेल, अशी भीती व्यक्त केली. केरळमधील शबरीमला मंदिरात मासिक पाळीच्या वयोगटातील महिलांच्या प्रवेशावर असलेली मर्यादा योग्य असल्याचे केंद्र सरकारने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात सांगितले. २०१८ मधील सर्वोच्च न्यायालयाचा निकाल पुरुष श्रेष्ठ आणि महिला कनिष्ठ दर्जाच्या आहेत, या गृहितकावर आधारित आहे, असे केंद्र सरकारकडून मांडण्यात आले. काही ठिकाणी पुरुषांनाही मंदिरप्रवेश नसल्याची उदाहरणे केंद्रातर्फे मांडण्यात आली. 'एक भीती आहे. जसे वेंकटरमणा देवरू प्रकरणात गौड सारस्वत ब्राह्मणांखेरीज इतरांना वगळण्यात आले होते, त्याप्रमाणे जर प्रवेशाचा अधिकार नाकारला, तर त्याचा हिंदू धर्मावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो,' असे न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या.

# जिथे असेल भीमनीती, तीच खरी भीमजयंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

एप्रिल महिना आला की, गाव-ेगावी, खेडोपाडी एकच आनंद, उत्साह असतो तो म्हणजे भीमजंयती मोठ्या धुमधडाक्यात साजरी करण्याचा. गा-वोगावी, खेडोपाडी, वार्डावार्डात जयंती उत्सव मंडळाची स्थापना केली जाते, भीमजंयती साजरी करण्यासाठी वर्गणीचे नियोजन केले जाते, लाखो रुपयांचा डिजे लावला जातो. वर्षातून एकदाच एकच जयंती येते म्हणून भीमजंयती च्या ना-वाखाली बौद्ध लोकांकडून वर्गणी गोळा केली जाते, एखाद्या व्यक्तीने वर्गणी दिली नाही तर त्याच्या बद्दल चुकीचे बोलले जाते. एकघ दिवस जयंती आहे म्हणून नाचलेच पाहिजे असा अट्टाहास हा भक्तांचा असतो. आणि लक्षात ठेवा भक्त कोणाचाही असो तो देशाला आणि समाजाला घातकच असतो. भीमजंयती निमित्ताने जागृत होणारे आणि वर्षभर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा विसर पडणारे लोक भीमजंयती साजरी करत असतील तर ती जयंती चुकीच्या मार्गाने केवळ भक्ती म्हणुनच होणार. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुयायी वर्षेभर कशाचीही अपेक्षा न ठेवता आ-पले काम सुरू ठेवत असतो. भीमजंयती ला नाचलेच म्हणजे जयंती साजरी केली असा अर्थ होतो का? एकच दिवस ना-चुन डॉ बाबासाहेब कळणार नाहीत तर वर्षभर बाबासाहेब आंबेडकर वाचावे लागतात. जो व्यक्ती डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचतो तो व्यक्ती नाचण्याचा आग्रह कधीच करत नाही. भीम जयंती साजरी करण्यामागे एक उद्देश असला पाहिजे आणि हो उद्देश साध्य करण्यासाठी प्रत्येकाने सहकार्य केले पाहिजे. केवळ जयंती आहे म्हणून नाचगाण्यासाठी वर्गणी देतो म्हणजे खुप मोठे काम करतो असे मुळीच नाही. जयंती दिनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, त्याग आणि आपले अस्तित्व यावर विचार विनीमय होणे आवश्यक आहे. समाजातील होतकरू, गरजू आणि हुशार विद्यार्थी शिक्षण, रोजगार कसा मिळेल? तो मिळवण्यासाठी किंवा निम ीण करण्यासाठी समाजाने काय योगदान द्यायला पाहिजे? यावर चर्चा होऊन उपाय शोधने आवश्यक आहे.

थोडक्यात आपण दरवर्षी करोडो रुपये जयंती निमित्ताने निरर्थक खर्च करतो तेच पैसे आपण योग्य प्रकारे, योग्य ठिकाणी खर्च केले असते तर आज समाजात स्वतः च्या शाळा, महाविद्यालये, बँका, दवाखाने निर्माण झाले असते. स्वतःच्या शाळा, कॉलेज असते तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित शिक्षण व गुणवत्ता आम्ही देऊ शकलो असतो. आमच्या बँका किंवा इतर उद्योग असते समाजातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून दैऊ शकलो असतो. दवाखाने निर्माण केले असते तर स्वस्तामध्ये एकदम चांगले उपचार सुरू गरजू लोकांना मिळाले असते. ह्या सुविधा निर्माण झाल्या असत्या तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित सुशिक्षित, जागृत विद्या-र्थी तयार करू शकलो असतो. एक स्वाभीमानी नागरिक तयार करू शकलो असतो. आणि अडी अडचणीच्या काळात योग्य व अल्पदरात उपचार मिळाले असते तर समाजाची प्रगती झाली असे माणले असते. आम्ही फक्त भाषणात बोलतो बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्या साठी हे केले ते केले परंतु मुख्य प्रश्न हा आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर गेल्या नंतर आपण आपल्या साठी काय केले? डॉ बाबासाहेब यांचे नाव घेऊन स्वतः चे घरे भरण्यासाठी दुकानदारी सुरू केली. स्वाभीमानाच्या नावाखाली, राजकीय ओळख निर्माण होण्यासाठी आणि स्वतःला थोडाफार तुकडा मिळण्यासाठी प्रस्थापितांचे तळवे चाटायला लागले. अनेक वैचारिक तरुणांकडे बुद्धीमत्ता, समाजासाठी काही करण्याची धमक आहे परंतु पोटाचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना प्रस्थापितांच्या सोबत काम करावे लागते. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे त्यांचा आवाज दाबल्या जातो. जर प्रस्तापितांच्या नियंत्रणात काम करताना चळवळ व समाजासाठी काही करण्याची धमक असलेल्या तरुणांना स्वतःच्या इच्छा दाबुन ठेवाव्या लागतात. जयंती निमित्त लाखों करोडो रुपयांची उधळण करणाऱ्या समाजात चळवळीसाठी व समाजासाठी झटणाऱ्या किती तरुणांना मदत केली जाते? हा गंभीर प्रश्न आहे. चळवळीच्या व समाजाच्या नावाखाली स्वतः चे नेतृत्व निर्माण करून स्वतः चेच पोट भरणारे अनेक झाले म्हणून वामनदादा कर्डक लिहतात..





**विनोद पंजाबराव सदावर्ते**
(समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००)

संघटना हजार झाल्या, नेते हजार झाले।

कोना म्हणावे आपुले, चेहरे हजार झाले।

तू पाहिलेली स्वप्न पूर्ण झालित का रे।

भीमा तुझ्या मतांची माणसे मेलित का रे।।

आणि आजही वामनदादांचा शब्दंशब्द खरा ठरत आहे. नेत्यांनी चळवळीची व समाजाची वाट लाऊन स्वाभिमान तर दावणीला बांधला आहेच परंतु, स्वतः ला प्रबोधनकार, गायक, लेखक, व्याख्याते समजणाऱ्या लोकांनी सुद्धां चळवळीचे वाटोळे केले. वरील लोक घसा कोरडा होईपर्यंत ओरडून ओरडून वामनदादा कर्डक यांच्याच ओळी सांगतात....

उद्धरली कोटी कुळे , भीमा तुझ्या जन्मामुळे

अगदी शंभर टक्के बरोबर आहे. भीमाच्या जन्मामुळे कोट्यवधी कुळांचा उद्धार झाला. पण प्रश्न हा आहे भीमामुळे कोट्यवधी कुळाचा उद्धार झाल्यावर, ज्यांचा ज्यांचा उद्धार झाला त्यांनी किती लोकांचा उद्धार केला? एका भीमाने कोटींचा उद्धार आणि कोटींनी मिळून एकाचाही उद्धार केला नसेल तर ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहेत असे वाटते का? बर हे ही जाऊ द्या बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ जोरजोरात ओरडून सांगणारे व्याख्याते, गायक लाखों रुपये घेतल्या शिवाय येतच नाहीत. बर हे लाखों रुपये घेतात आणी समाजासाठी एकही रुपया देतच नाहीत. ज्या वामनदादांनी आयुष्य भर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार खेडोपाडी पो-होचवले त्यांनी रुपयांची कमाई केली नाही. आणि दादांचे गाणे गाऊन लाखोंची सुपारी घेणारे आणि समाजातील गरजु घटकावर एकही रुपया खर्च न करणारे खरचं डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहेत का? की फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला भांडवल बनवून स्वतः चे खिसे भरणारे पाकीट बाज कलाकार आहेत हे बघने गरजेचे आहे. लाखो रुपये घेऊनही वक्ते आणि गायक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची चुकिची मांडणी करतात. तिरस्कार, द्वेष निर्माण होईल अशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची मांडणी करतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात अनेक गायक रक्तात भीम शोधून विचाराची हत्या करतात. तर अनेक गायक वक्ते स्टेजवर गेल्यावर बाबासाहेब यांच्या वर बोलण्या ऐवजी इतर कोणत्याही लोकांची नावे घेऊन आमचं वाटोळे केले म्हणतात, कोणत्याही संघटनेचे नाव घेऊन ही संघटना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, कार्य व संविधान विरोधी आहेत म्हणून सांगतात. लाखों रुपये घेऊनही, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आम च्या जिवनाच सोनं केले, देशाचा उद्धार केला हे सांगण्याचे धाडस होत नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना मर्यादित आणि चुकिच्या पद्धतीने मांडण्याचे काम या लोकांनी केले. कोणती अमुक संघटना आमच्या विरोधात काम करत आहे हे सांगण्या ऐवजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या संघटनांनी एकत्र यावे हे मात्र पद्धतशीर पणे विसरतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे द्वेषाचे नाहीत तर यशाचे प्रतिक आ-हेत, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्धच नाही तर लोकांची बुद्धीही वाढवली, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक घरातील स्त्री घडवली, शिक्षण, हक्क अधिकार सर्वांना दिले या गोष्टी आम्ही सांगण्यात कमी पडतो. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे जातीचे नाहीत तर देशाचे उद्धारक आहेत याचे च भाण बोलणाऱ्यांना नसते. जयंती ला जर लाखों रुपयांचा चुराडा होत असेल आणि त्या ठिकाणी वाचणालय नसेल, समाजातील तरुण बेरोजगार असतील, दवाखान्यासाठी कोणाकडे पैसे नसतील, आणि तरीही डिजे लावलाच जात असेल तर हे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित आहे का? डिजे, मोठ मोठे स्वतः चे बँनर समाजाच्या पैशावर लावून नेमकं काय सिद्ध करायचे असते हाच खुप गहण विषय आहे. डिजेच्या माध्यमातून वर्गणी गोळा करून जयंती साजरी करणे चुकीचेच आहे. जयंती खरचं साजरी करायची असेल आणि जयंती साजरी केल्याचा फायदा सर्वांना होऊ द्यायचा असेल तर जयंती च्या नावाखाली सध्या जेवढी वर्गणी जमा करता त्यापेक्षा जास्त जमा करावी. परंतु जमा झालेल्या पैशाचा उपयोग गावात शाळा, दवाखाना, रोजगाराची साधने उभी करण्यासाठी व्हावा. माणसाच्या शैक्षणिक, आरोग्य, रोजगार विषयक समस्या जर जयंती साजरी करण्याच्या माध्यमातून मिटत असतील तर दररोजच धुमधडाक्यात जयंती साजरी होईल. आपण हा विषय गांभीर्याने घेतला तर आपली स्वतः ची शाळा, दवाखाने, रोजगार साधने, बँका प्रत्येक तालुक्यात उभे राहतील आणि तेव्हा आमचा स्वाभिमान खऱ्या अर्थाने जागृत असेल आणि भीमजंयती साजरी झाल्याचा आनंद हा गणणात न मालणारा असेल. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने नाचने वंद केले पाहिजे आणि वाचणे सुरू केले पाहिजे तरच येणाऱ्या पिढ्या आपण वाचवू. जयंती निमित्ताने चोवीस तास वाचन, अठरा तास वाचन हा केवळ देखावा आणि भक्तांचे लक्षण आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर दररोज एकच तास वाचा परंतु नियमित वाचुन डोक्यात घ्या. तरच आपल्या भीमनीती कळेल आणि तेव्हाच भिमजयंती साजरी झाल्याचे समाधान मिळते.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाला गती; जिल्ह्यात ४२३ तरुणांच्या उद्योगांना बँकेचे बळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : राज्यातील सुशिक्षित तरुण-तरुणींना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाला जालना जिल्ह्यात मोठी गती मिळाली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी जिल्ह्याला देण्यात आलेल्या ७८० कर्ज मंजुरीच्या उद्दिष्टापैकी आतापर्यंत ४२३ प्रस्तावांना बँकांनी मंजुरी दिली असून ५४ टक्क्यांहून अधिक उद्दिष्ट पुर्ण झाले आहे. अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर यांनी दिली.

वाढती बेरोजगारी आणि उद्योगातील नवनवीन संधी लक्षात घेऊन राज्य सरकारने २०१९-२० पासून ही म हत्त्वाकांक्षी योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. जालना जिल्ह्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत असून, जिल्हा उद्योग केंद्राने ११६० कर्ज प्रस्ताव बँकांकडे शिफारस केले होते. त्यापैकी ३३९ (७२.४५म) प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे. तसेच जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळाने शिफारस केलेल्या ४२८ प्रस्तावांपैकी ८४ (२६.९२म) प्रस्तावांना बँकांनी हिरवा कंदील दाखवला आहे.

मंजूर झालेल्या ४२३ अर्जांमध्ये सामाजिक आरक्षणा-चाही समतोल राखण्यात आला आहे. यामध्ये अनुसूचित जा-तीचे ६३, अनुसूचित जमातीचे ४, अल्पसंख्याक गटातील ३, इतर मागास प्रवर्गातील ११७ आणि खुल्या प्रवर्गातील २३५ लाभार्थ्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, उद्योजकतेत म हिलांचा सहभाग वाढत असून १६६ महिलांना कर्ज मंजूर झाले आहे, तर २५६ पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. ग्रामीण भागातील ३०४ आणि शहरी भागातील ११८ उद्योजकांना या माध्यमातून स्वत:चा व्यवसाय उभा करण्यास मदत झाली आहे.

या मोहिमेत स्टेट बँक ऑफ इंडियाने सर्वाधिक ९० प्रकरणांना मंजुरी दिली आहे. त्यापाठोपाठ महाराष्ट्र ग्रामीण बँक (७३), बँक ऑफ महाराष्ट्र (४९) आणि इंडसइंड बँक (४१) यांनी मोलाचे सहकार्य केले आहे.

# १२०० सिलेंडरचा घोळ, सात लाखांची ब्लॅकने विक्री; तणावाखाली आलेल्या वितरकाचा जीवन संपवण्याचा प्रयत्न, धाराशिवमध्ये खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : गॅसच्या स्टॉक आणि वितरणामध्ये तफावत असल्याने तणावाखाली आलेल्या गॅस वितरकाने जीवन संपवण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना धाराशिवमध्ये घडली. ज्ञानेश्वर माळी असं गॅस वितरकाचं नाव असून कंपनीच्या तपासणीनंतर तो तणावाखाली होता.

या वितरकाने १२०० सिलेंडरचा घोळ घातल्याचं आणि तब्बल सात लाख किमतीच्या सिलेंडरची ब्लॅकने विक्री केल्याची चर्चा आहे. गॅस वितरकावर सोलापूरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेचे पोलिसांनी अधिकचा तपास सुरू केला आहे.

तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथील डीलर ज्ञानेश्वर माळी याने तणा-वाखाली असल्याने हे पाऊल उचलल्याची माहिती आहे. गॅस कंपनीने त्याच्या एजन्सीची तपासणी केली होती. त्यामध्ये कंपनीला स्टॉक आणि वितरणामध्ये मोठी तफावत असल्याची माहिती समोर आली.



गेल्या अनेक दिवसा-पासून या गॅस वितरकाकडे रिकव्हरी असल्याने त्याचा पुरवठाही बंद होता अशी माहिती समोर आली आहे.

घटनास्थळी तामलवाडी पोलीस दाखल झाले असून त्यांनी पुढील तपास सुरू केला आहे. सध्या धाराशिव जिल्ह्यात आखाती युद्धामुळे गॅस टंचाई मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यात डीलरने कंपनीच्या बैठकीत जीवन संपवण्याचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाल्याचं चित्र आहे.

नागपूरमध्ये सिलेंडर पळव-ले

नागपूरच्या जरीपटका भागात एका गॅस एजन्सीबाहेर सिलेडर घेण्यासाठी रांगा लागल्या होत्या. खूप वेळापासून रांगेत उभं असूनही सिलेडरचं वितरण केलं जात नव्हतं, म्हणून संतापलेल्या नागरिकांनी गॅस सिलिंडर घेऊन पळ काढला. मात्र थोड्याच वेळात पोलीस आले आणि संपूर्ण परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यानंतर नागरिकांनीही सिलेडर परत आणून दिले.

यवतमाळमध्ये नागरिकांना मनस्ताप

यवतमाळच्या दारव्हामध्ये ग्रामीण भागात घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला आहे. भर उन्हात नागरिक रांगा लावत आहे. मात्र तासन-तास थांबूनही गॅस मिळत नसल्याने ग्राहकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. एजन्सीकडे तुलनेने कमी सिलिंडर येत असले तरी, व्यवस्थित वितरण झाल्यास ग्राहकांना होणारा त्रास कमी होऊ शकतो. मात्र नियोजनाचा अभाव असल्याने सिलिंडर तर मिळतच नाही, उलट मनस्ताप सहन करावा लागत आहे.

बीडमध्ये घरगुती गॅस सिलेंडरची टंचाई

बीडमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे गॅस एजन्सी बाहेर नागरिकांच्या रांगा पाहायला मिळत आ-हेत. गेवराईतील ग्रामीण भागात गॅस एजन्सी उघडण्यापूर्वीच नागरिकांनी सिलेंडरच्या रांगा लावल्याचं दिसून आलं. सिलेंडरच्या होणाऱ्या काळा बाजारामुळे नागरिकांना सिलेंडर मिळण्यास अडथळे निर्माण होत आहे. परस्पर ओटीपी मिळवून सिलेंडर विक्रीचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे गॅस टंचाई निर्माण होत आहे. या सर्व बाबीचे नियोजन करावे अशी मागणी नागरिकांची आहे.

## मिरा-भाईंदरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा उभारणीला गती

# सामाजिक न्याय विभागाकडून १.४६ कोटींची तरतूद : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर, सर्वे क्र. २३३ येथील जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १६ फुटी पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीस गती मिळाली असून, यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत मिरा-भाईंदर महापालिकेला १ कोटी



४६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पुढील सहा महिन्यांत पुतळा उभारणीची प्रक्रिया पूर्ण होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्रालयात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या दालनात आयोजित बैठकीनंतर ते बोलत होते. या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे सचिव हर्षदीप कांबळे तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त राधा बिनोद शर्मा शहर अभियंता दीपक खांबित यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, संबंधित सर्वे क्रमांकातील सुमारे ३८०० चौ.मी. जागा यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासह बहुउद्देशीय इमारत उभारण्यासाठी सुरुवातीला सुमारे १४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात या स्मारकासाठी २० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधीही मंजूर करण्यात आला.

या निधीतून लंडनमधील स्मारकाच्या धर्तीवर ठाणे जिल्ह्यातील पहिले भव्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक मिरा-भाईंदर शहरात साकारले जात आहे.

दरम्यान, आंबेडकर प्रेमी जनतेच्या मागणीचा विचार करून स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून या ठिकाणी १६ फुटी पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा पुढाकार घेतल्याचेही सरनाईक यांनी स्पष्ट केले. पुतळा उभारणीसाठी सुमारे २०० चौ.मी. जागेची आवश्यकता असून ती सामाजिक न्याय विभागामार्फत महापालिकेला हस्तांतरित करण्यात येत आहे. तसेच शासनाच्या २ मे २०१७ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्रे आणि इतर कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

या सर्व प्रक्रियेमुळे मिरा-भाईंदर परिसरात लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारक व पूर्णाकृती पुतळा उभारणीस गती मिळणार असल्याचा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# गोगावच्या सरपंच सुरवसे यांच्याकडून शांभवी कल्याणशेट्टी यांचा गौरव

## जि.प. विजयाचा जल्लोष, शांभवीताई कल्याणशेट्टी यांचा सन्मान लोकाभिमुख नेतृत्वाचा गौरव, महिलांच्या नेतृत्वाची ताकद पुन्हा अधोरेखित : सरपंच सौ सुरवसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी, अक्कलकोट : अक्कलकोट येथे नूतन जिल्हा परिषद सदस्या सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी यांचा गोगावच्या सरपंच सौ. वनिता मधुकर सुरवसे यांच्या हस्ते अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात भव्य सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषद निवडणुकीत दणदणीत व उल्लेखनीय विजय संपादन करून शांभवीताई कल्याणशेट्टी यांनी आपल्या प्रभावी नेतृत्वाची ठसठशीत छाप उमटवली आहे. त्यांच्या कार्यक्षम, जनसंपर्कावर आधारित व लोकाभिमुख कार्यपद्धतीमुळे त्या सर्वसामान्य नागरिकांच्या विश्वासास पात्र ठरल्या आहेत. त्यांच्या या विजयामुळे अक्कलकोट तालुक्याच्या विकासाला नवी गती



व दिशा मिळेल, असा ठाम विश्वास गोगावच्या सरपंच वनिता सुरवसे यांनी व्यक्त केला.

यावेळी सरपंच सौ. वनिता सुरवसे यांनी शांभवीताईंना पुष्पहार अर्पण करून व भेटवस्तू देऊन सन्मानित केले.

आपल्या मनोगतात त्यांनी शांभवीताई यांच्या कर्तृत्वाचे व नेतृत्वगुणांचे कौतुक करत, त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासकामांना अधिक वेग मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

शांभवीताई कल्याणशेट्टी या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या, सर्वसामान्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील असणाऱ्या व नेहमी जनतेशी जोडलेल्या नेत्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या साध्या, सुसंस्कृत व प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे त्यांना सर्व स्तरातून मोठा प्रतिसाद व पाठिंबा लाभत आहे.

या सत्कार सोहळ्यास सुरवसे परिवार, स्थानिक मान्यवर, महिला प्रतिनिधी, कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण उत्साह, अभिमान व आनंदाने भारलेले होते.

# जयंती गुरु शिष्यांची,: पंढरपुरात महाराष्ट्र नवनिर्माण सेना व भीमशक्ती मंडळाकडून कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महात्मा ज्योतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने मनसेने ते दिलीप धोत्रे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र नवनिर्माण सेना व भीम शक्ती संस्कृती बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने असून कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभागाच्या नगरसेविका सौ माधुरीताई दिलीप धोत्रे यांनी केले आहे.

देशभरात महात्मा ज्योतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक कार्यक्रमाने मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. पंढरपुरात गुरु शिष्यांच्या जयंतीनिमित्त मनसे आणि भीम शक्ती मंडळाच्या वतीने सर्व धर्मीय विवाह सोहळा, होम मिनिस्टर, संविधान पुस्तकाचे वाटप आणि भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवारी दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन मनसेने ते दिलीप बापू धोत्रे यांच्या हस्ते व नगरसेवक विनायक देव्हारे अध्यक्षतेखाली आणि माजी नगरसेवक शिवाजी मस्के, समाजसेवक पृथ्वीराज भोसले, संतोष धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे. व सोमवार दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी रात्री बारा वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मनसेने ते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते नगरसेविका माधुरीताई धोत्रे यांच्या अध्यक्षतेखाली आणि नगरसेवक लोकेश यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे तर मंगळवार दिनांक १४ एप्रिल





२०२६ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनांक प्रतिमेचे पूजन व रॅलीचे उद्घाटन भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल दादा सावंत यांच्या हस्ते ज्ञानेश्वर ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली आणि नगरसेवक अक्षय गंगेकर नगरसेवक प्रसाद कळशी समाजसेवक नानासाहेब कदम, माजी नगरसेवक धनंजय कोताळकर समाजसेवक सुमित शिंदे, अर्जुन माळवदे यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे मंगळवार दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सात वाजता संविधान पुस्तकाचे वाटप नगरसेवक संजय बनपट्टे यांच्या हस्ते मनसेनेतील दिलीप धोत्रे यांच्या अध्यक्षतेखाली आणि नगरसेवक ओंकार जोशी नगरसेवक राहुल शिंदे नाही मनसेचे अध्यक्ष संतोष कवडे माजी नगरसेवक सुधाकर बंदपट्टी प्रशांत शिंदे समाजसेवक वैभव बडवे प्रसाद मलपे युवराज भोसले, शनिमहाराज घुले यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे गुरुवार दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले असून सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मनसेने ते दिलीप धोत्रे तर प्रमुख उपस्थित म्हणून आमदार अभिजीत पाटील, युवक नेते भगीरथ भालके, भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत गटनेती नगरसेवक नागेश भोसले तीर्थ विभाग आघाडीचे अध्यक्ष सुधीर धुमाळ संतोष मुळे किरण राज घाडगे आदित्य फत्त, सुधीर धोत्रे दत्ता भोसले, चव्हाण गणेश उबाळे यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे शुक्रवार दिनांक १७ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष प्रणिता भालके यांच्या हस्ते होणार असून अध्यय स्थानी सौ ज्योती संतोष सर्व गोड सौ विद्या अरुण सर्व रोड या उपस्थित राहणार असून नगरसेविका माधुरीताई धोत्रे नगरसेविका प्रणिती गाडगे नगरसेविका रुक्मिणी धोत्रे नगरसेविका स्मिता फत्तेपूरकर नगरसेविका साधना धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

सोमवार दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून मिरवणुकीची सुरुवात मंचनेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते पुष्पहार घालून होणार असून या कार्यक्रमासाठी पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे ज्येष्ठ नेते सुधीर भोसले समाजसेवक बाबा चव्हाण मनसे शहर अध्यक्ष गणेश उबाळे हे उपस्थित राहणार आहेत.

# शाळांची पट पडताळणी जुलै - ऑगस्ट महिन्यात करा, मुख्याध्यापक संघाची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने पट पडताळणी रद्द करण्याविषयीचे निवेदन आज माध्यमिक शिक्षणाधिकारी मा.श्री. प्रशांत डिग्रसकर साहेब सादर करयात आले. महाराष्ट्र राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची पट पडताळणी येत्या११,१५ आणि २२ एप्रिल रोजी करण्याबाबत महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या वतीने राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक)यांना आदेश प्राप्त झाले आहेत. परंतु सध्या राज्यातील सर्व शाळेत वरील आदेशानुसार दिलेल्या तारखांना पँट परीक्षा तसेच द्वितीय सत्र परीक्षा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांची पट पडताळणी करणे अडचणीचे ठरणार आहे. सदर पट पडताळणी करून अहवाल सादर करणे जिकिरीचे आहे. तरी शाळांची अडचण विचारात घेऊन शासनाने पारित केलेला आदेश रद्द करण्यात यावा. वहीच पट पडताळणी ही जुलै ऑगस्ट महिन्यात करावी अशी एकमुखी मागणी जिल्हा मुख्याध्यापक संघ व जिल्ह्यातील विविध शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांच्या वतीने वरील निवेदनात करण्यात आली आहे.वरील निवेदन माननीय शिक्षण संचालक यांचेकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

असे आश्वासन शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांनी दिले आहे.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव एस. बी.देशमुख, नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रदीप सांगळे, कार्याध्यक्ष एस. के. सावंत, मार्गदर्शक बाळकृष्ण नागरे, मार्गदर्शक भागीनाथ घोटेकर,विद्या सचिव डॉ. अनिल माळी, सदस्य सुनील आहेर, धनंजय पाठक,रघुनाथ गायकवाड,सुहास गावित,नाशिक शहर अध्यक्ष सुरेश घरटे आदी मान्यवर उपस्थित होते.

# समता बुद्ध विहार यांच्यावतीने संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज ; घाटकोपर पश्चिम इंदिरा नगर येथील समता बुद्ध विहार यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदा ही दि.१३ ते १६ एप्रिल या चार दिवसीय संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,भगवान गौतम बुद्ध,क्रांतीज्योती महात्मा जोतिबा फुले,छत्रपती शिवाजी महाराज,राजर्षी शाहू महाराज यांचा संयुक्त जयंती महोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

यावेळी दि.१३ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे आगमन होणार असून दुसऱ्या दिवशी दि.१४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.त्यानंतर दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी.५.०० ते रात्री १०.३० वाजेपर्यंत अर्जुन ओव्हाळ आणि पार्टी यांचा भिम गीतांचा कार्यक्रम होणार आहे. तर दि.१६ एप्रिल रोजी सायंकाळी ७.०० ते १०.३० वाजेपर्यंत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी या संयुक्त जयंती महोत्सव कार्यक्रमात सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती तसेच समता बुद्ध विहार,समता महाउपासिका संघ बहुउद्देशीय महिला मंडळ,पंचशील बुद्ध विहार,समता प्रतिष्ठान यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# भारतीय बहुजन पक्ष व उ.बा.ठा.शिवसेनेचे अंबादास दानवे यांच्यासोबत बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : भारतीय बहुजन पक्षाचे महाराष्ट्रभर अतिशय चांगल्या पद्धतीने कार्य सुरू असुन समाजाच्या अडी अडचणी व समस्या सोडविण्यासाठी भारतीय बहुजन पक्ष काम करत आहे. तसेच महिला भगिनीवर होणारे अन्याय अत्याचार गावा गावात खेड्या पाड्यात होणारे अन्याय अत्याचार अशा अनेक अन्यायाकडे भारतीय बहुजन पक्षांचे तळागळात कार्य चालू असुन पक्षाचे पदाधिकारी बारकाईने लक्ष देत आहेत. व ज्या ठिकाणी कुठलाही अनुसूचित प्रकार घडलेला असेल त्या ठिकाणी तत्काळ भारतीय बहुजन पक्षाचे



पदाधिकारी जाऊन प्रशासनाला जाब विचारण्याचे कार्य करत आहेत. पक्ष स्थापना होऊन सहा महिने झालेआहे. तरी या पक्षाकडे सर्व राजकीय लोकांचे बारकाईने लक्ष आहे. यामध्ये पक्षाचे संस्थापक अध्यक्ष राजाभाऊ थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रभर सर्व काम करत आहेत. या पक्षामध्ये कार्य करणारे पदाधिकारी अतिशय अभ्यासपूर्ण नेतृत्व करत आहेत. त्यामुळेच दि.७ एप्रिल २०२६ रोजी ठाणे येथील शासकिय विश्रामगृहात उबाठा शिवसेनेचे अंबादास दानवे व भारतीय बहुजन पक्षाचे पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये समाजीक व राजकिय चर्चा झाली आहे. या बैठकीस पक्षाचे संस्थापक अध्यक्ष राजाभाऊ थोरात, युवा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ .अभिमान कांबळे, महाराष्ट्राचे अध्यक्ष योगेश लोंढे, महाराष्ट्र राज्य सचिव विकास गायकवाड, युवा जिल्हा अध्यक्ष बबनराव खुडे, महाराष्ट्र वाहतूक आघाडीचे लहू लोखंडे, पांडुरंगराव जाधव यांच्या सह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी काळात गाव तिथे पक्षाची शाखा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## पंढरपूर तहसीलदारांना अ.भा. मराठा महासंघाने दिले निवेदन

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा बसवणे बाबत राज्य सरकारने नियमावली तयार करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक राजाधीश छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसवण्यासाठी शासनाने तातडीने कडक नियमावली तयार करावी. जेणेकरून सामाजिक सलोखा राहील काही विघ्नसंतोषीलोक महाराजांचे पुतळ्याचे नाव खाली आपली राजकीय पोळी भाजण्याचा तसेच आपला व्यवसाय वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करत आहेत, तेव्हा अशा प्रवृत्तींना वेळीच पायबंद करण्यासाठी खाली नियमावली तयार करावी.




१) पुतळा जेथे बसवायचा आहे ती जागा अगोदर निश्चित करून रीतसरर परवानगी घ्यावी.

२) जागा शासकीय असावी वैयक्तिक जागेवरती सार्वजनिक ठिकाणी पुतळा बसू नये.

३) पुतळा प्लास्टिक किंवा फायबरचा नसावा.

४) पुतळा दर्जेदार धातूचा किंवा पाषाणाचा असावा.

५) भविष्यात पुतळ्याची विटंबना होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) जो व्यक्ती किंवा मंडळ पुतळा बसणार आहे त्यांच्याकडून देखभाल करण्याचे करारपत्र घ्यावे.

७)जातीय तेढ निर्माण होईल अशा कोणत्या परवानगी देऊ नये.

८) महाराजांच्या पुतळ्याशेजारी चित्र संग्रहालय, ग्रंथालयाची निर्मिती करावी.

९)पुतळ्याचे सुशोभीकरणासाठी शासनाने निधीची तरतूद करावी. असे अखिल भारतीय मराठा महासंघ सोलापूर जिल्हा यांच्या वतीने माननीय तहसीलदार साहेब यांना निवेदन देण्यात आले. या प्रसंगी अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष-अर्जुनराव चव्हाण, शिवाजीराव मोरे, हनुमंत कदम, सचिन गंगथडे, वैभव चव्हाण, रोहित चव्हाण, सुहास निंबाळकर, संतोष जाधव, अमोल पवार, नानासो शिंदे, अमर शिंदे, शुभम ताटे, काका यादव, पांडुरंग शिंदे, शामराव साळुंखे, नागेश गायकवाड, सौ. प्रभावती गायकवाड, रतन थोरवत, बालाजी शिंदे, पै. चरण साळुंखे, दिपक कोठावळे, दिपक गोरे, सुमित गाजरे,प्रज्वल घाडगे, मालोजी शेंबडे, अनिल उकरंडे यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# दहावीनंतरच्या करिअरविषयी विशेष मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे दहावी आणि त्यानंतर प्रश्न पडतो दहावीनंतर पुढे काय? हा प्रश्न विद्यार्थी आणि पालक दोघांसाठीही चिंतेचा विषय असतो. या महत्त्वाच्या आणि निर्णायक टप्प्यावर योग्य दिशा मिळावी आणि करिअर निवडीतील संभ्रम दूर व्हावा, यासाठी माईर्स एमआयटी पुणे संचालित, एमआयटी विश्र्वशांती गुरुकुल वाखरी, पंढरपूर येथे एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या वतीने शनिवार, दिनांक ११ एप्रिल रोजी विशेष करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या करिअर मार्गदर्शन विशेष चर्चसत्रात प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि करिअर समुपदेशक विवेक वेलणकर विद्यार्थी व पालकांना दहावीनंतर करिअरची निवड कशी करावी आणि विविध क्षेत्रातील संधींविषयी सखोल मार्गदर्शन करणार आहेत. तसेच एनडीए (छऊ) म्हणजेच संरक्षण क्षेत्रातील करिअरच्या संधींविषयी कर्नल डी. के. उपाध्याय मार्गदर्शन करणार आहेत. आजच्या बदलत्या काळात उपलब्ध असलेले विविध करिअरचे पर्याय, यासाठी द्याव्या लागणाऱ्या प्रवेश परीक्षा कोणत्या आणि त्यांची तयारी याविषयी सखोल मार्गदर्शन यावेळी करण्यात

**प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि करिअर समुपदेशक विवेक वेलणकर यांचे मार्गदर्शन**

येईल. विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यास योग्य दिशा देण्यासाठी आणि योग्य निर्णय घेण्यासाठी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुलतर्फे करण्यात आले आहे.

कार्यक्रमातील मार्गदर्शनाचे प्रमुख विषय:

- NDA, JEE, NEET, NAVY यांसारख्या प्रवेश आणि स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी कशी करावी
- सायन्स व कॉमर्स शाखांमधील आधुनिक व उच्च संभाव्यतेचे करिअर पर्याय
- योग्य कोर्स निवडीसाठी आवश्यक निकष व भविष्यातील आव्हाने
- विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या सर्व शंकांचे थेट निरसन

**विशेष वाहतूक सुविधा:**

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पंढरपूर येथील बस स्टँड, अर्बन बँक, शिवाजी महाराज चौक व ठाकरे चौक येथून दुपारी ४.३० वाजता बसची विनामूल्य व्यवस्था करण्यात आली आहे.

कार्यक्रमाविषयी - कधी, केंव्हा, कुठे:

- दिनांक: शनिवार, ११ एप्रिल २०२६
- वेळ: सायंकाळी ५.०० ते ७.००
- स्थळ: एमआयटी विश्वशांती गुरुकुल कॅम्पस सभागृह, वाखरी पालखीतळ, पंढरपूर
- प्रवेश: सर्व १० वी उत्तीर्ण विद्यार्थी व पालकांसाठी पूर्णपणे मोफत
- अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी ९२०९०४३७३९ या क्रमांकावर संपर्क साधावा

# इतिहासाशी छेडछाड खपवून घेणार नाही; मराठा नकाशा पुन्हा द्या, मराठा महासंघाचा इशारा




## पंढरपूरमध्ये अखिल भारतीय मराठा महासंघाचे निवेदन, आंदोलनाचा दिला इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात अलीकडे करण्यात आलेल्या बदलांमध्ये इतिहास विषयातून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने आज पंढरपूर येथे उपविभागीय अधिकारी (प्रांत साहेब) सचिन इथापे यांना निवेदन देण्यात आले.

महासंघाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मराठा साम्राज्य हा केवळ ऐतिहासिक विषय नसून तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व राष्ट्रीय अस्मितेचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या स्वराज्याचा विस्तार विद्यार्थ्यांना नकाशाच्या माध्यमातून स्पष्टपणे समजणे आवश्यक आहे. मात्र, काही इयत्तांमधून हा नकाशा वगळण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या इतिहासाच्या आकलनावर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता महासंघाने व्यक्त केली आहे.

या निवेदनाद्वारे महासंघाने पुढील प्रमुख मागण्या शासनासमोर मांडल्या आहेत:

१) शालेय इतिहासाच्या पुस्तकांमध्ये मराठा साम्राज्याचा नकाशा पूर्ववत व स्पष्ट स्वरूपात पुन्हा समाविष्ट करावा.

२) डिजिटल माध्यमांद्वारे (QR कोड / ई-सामग्री) नकाशाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी.

३) या विषयावर तज्ज्ञ समिती स्थापन करून अभ्यासक्रमाचे पुनरावलोकन करावे.

प्रांत साहेब यांनी निवेदन स्वीकारून याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तसेच, या मागण्यांवर लवकरात लवकर निर्णय न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मराठा महासंघाच्या वतीने देण्यात आला.

या प्रसंगी अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष-अर्जुनराव चव्हाण, शिवाजीराव मोरे, हनुमंत कदम, सचिन गंगथडे,वैभव चव्हाण, सुहास निंबाळकर, संतोष जाधव, अमोल पवार, नानासो शिंदे, अमर शिंदे, शुभम ताटे, काका यादव, पांडुरंग शिंदे, शामराव साळुंखे, नागेश गायकवाड, सौ. प्रभावती गायकवाड, रतन थोरवत, बालाजी शिंदे, शरण साळुंखे, दिपक कोठावळे, दीपक गोरे, सुमित गाजरे,प्रज्वल घाडगे, मालोजी शेंबडे, अनिल उकरंडे यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## माणसाच्या आयुष्याचे क्रेडिट कार्डच बाबासाहेब आंबेडकर आहेत : अंजू कांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : प्रत्येक मानवी घटकाला जगण्यासाठी नवे जीवन दिले. नवा स्वाभीमान दिला. नवा जन्म दिला. ते केवळ महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले. त्यातही कोणता भेदाभेद न करता प्रत्येक माणूस जगावा आणि समाजाचे भले करावे. यासाठी स्वत:च्या जीवाची परवा न जुमानता बाबासाहेबांनी दिले. म्हणून ते प्रत्येक मानवी घटकाच्या आयुष्याचे क्रेडिट कार्ड आहेत. असे प्रतिपादन गोंदिया जिल्हा माहिती अधिकारी श्रीमती अंजू कांबळे यांनी केले. त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

यावेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली पुष्कराज लांजेवार, साधना पारधी, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर, तुषार महाजन आदी कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रसंगी संत गाडगेबाबा, सावित्रीबाई फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

**सामाजिक समता सप्ताह व गाडगेबाबा जयंती साजरी**

सदर कार्यक्रम हा सामाजिक समता सप्ताह व महाळ चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष दुसरे दिवस निमित्ताने अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरामुर्री येथे सकाळी १२.३० वाजता आयोजित करण्यात आले होते.



मार्गदर्शन करतांना अंजू कांबळे म्हणाल्या- महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर व अन्य महापुरुषांच्या विचारांवर व कार्यावर प्रगाढ प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. संचालन प्रदीप ढवळे यांनी केले तर आभार नीता भलमे यांनी मानले. यशस्वीतेसाठी कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

## जालना येथे अमृतपेठ थेट बाजारपेठ प्रदर्शनाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्राहकांना दर्जेदार वस्तू थेट उत्पादकांकडून उपलब्ध करून देण्यासाठी अमृतपेठ - थेट बाजारपेठ या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन येत्या ११ व १२ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. सदर प्रदर्शनाचे ठिकाण महेश भवन, मंठा चौफुली, जालना असे असून सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत प्रदर्शन सर्वासाठी खुले राहणार आहे. अमृतपेठ - थेट बाजारपेठ प्रदर्शनामध्ये घरगुती खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, कपडे, दागिने तसेच विविध उपयुक्त वस्तूंचे स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. या माध्यमातून स्थानिक महिला व उद्योजकांना त्यांच्या उत्पादनांची थेट विक्री करण्याची संधी मिळणार आहे. तसेच ग्राहकांना एकाच ठिकाणी विविध दर्जेदार वस्तू खरेदी करण्याची संधी मिळणार आहे.




## नंदगाव येथे जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील सह सभापती, उपसभापती प.स./ जि. प. सदस्यांचा सत्कार सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथे जिल्हा परिषद धाराशिव चे नूतन अध्यक्ष,सभापती उपसभापती जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सदस्य आदी मान्यवरांचा सत्कार सोहळा थाटामाटात संपन्न झाला.

जिल्ह्याचे मिनी मंत्रालय म्हणून ओळखले जाणाऱ्या जिल्हा परिषद धाराशिवच्या अध्यक्षा अर्चना ताई राणाजगजितसिंह पाटील, पंचायत समिती तुळजापूरचे नुतन सभापती विक्रमसिंह देशमुख उपसभापती सौ.रोहिणीताई विवेकानंद मेलगिरे यांच्यासह नूतन जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य आदींचा तुळजापूर तालुक्यातील नंदगाव जि.प.गटातील समस्त ग्रामस्थांच्या वतीने नंदगाव येथे नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी धाराशिव जिल्हा परिषदच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांचे नंदगाव नगरीत आगमन होताच फटाक्याची अतिषबाजी करत जेसीबी वरून फुलांची उधळण करून ढोल ताशाच्या गजरात हलगीच्या निनादात त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.तर सचिन सिद्धेश्वर कोरे यांच्या प्रास्ताविकानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चनाताई पाटील,जिल्हा परिषदचे नुतन अर्थ व बांधकाम सभापती सिद्धेश्वर अण्णा कोरे, पंचायत समिती तुळजापूर चे सभापती विक्रम सिंह देशमुख, उपसभापती सौ. रोहिणीताई विवेकानंद मेलगिरे, काटगाव जिल्हा परिषद गटातून विजयी झालेले जिल्हा परिषद सदस्य निवृत्ती माळी, काक्रंबा जि.प. गटातुन निवडून आलेले दयानंद शिंदे,सिंदफळ गटातून विजयी झालेल्या शितल आनंद ढाले, काठी जिल्हा परिषद गटातून निवडून आलेल्या अशा ब्रह्मदेव भाले, खुदावाडी पंचायत समिती गणातून विजयी झालेले भिवाजी इंगोले, जळकोट पंचायत समिती गणातून विजयी झालेले आशिष गणेश सोनटक्के आदींचा येथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी सत्काराला उत्तर देताना अर्चनाताई पाटील म्हणाले की सिद्धेश्वर अण्णा कोरे यांच्या एकनिष्ठ आणि प्रामाणिक पणे केलेल्या आणि करत असलेल्या कामाचे फळ त्यांना मिळालेले असून जिल्हापरिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती म्हणून ते आज जिल्हा परिषदेमध्ये विराजमान झालेले आहेत. त्यांच्या माध्यमातून आणि आमदार राणा दादांच्या मार्गदर्शनाखाली केवळ नंदगाव गटाचा नव्हे तर तुळजापूर तालुक्यातील सर्व गावातील विकास कामाला गती देण्याचा मी जिल्हा परिषद अध्यक्ष या नात्याने प्रयत्नशील आहे. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव वडगावे,दिलीप तात्या समोसे, नळदुर्ग नगर परिषदेचे नगराध्यक्ष



बसवेश्वर आप्पा धरणे,माझी पंचायत समिती सदस्य महादेव सालगे, नंदगावचे सरपंच शषिकांती नागीले, रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, भाजपा मिडीयासेलचे तालुकाअध्यक्ष किशोर धुमाळ, पत्रकार निजाम शेख सह नंदगाव घाटातील सर्वगावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ महिला युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन भैरवनाथ कानडे यांनी केले

## कळंब येथील विद्याभवन प्रशालेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमा निमित्त साहित्यिक सोपान पवार यांच्या व्याख्यानाचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंबे येथील विद्याभवन हायस्कूल प्रशालेत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमांतर्गत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर तसेच सन २०२६ हे वर्षे महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. त्यानिमित्त साहित्यिक सोपान पवार यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक कुंभार व्ही जी, उपमुख्याध्यापक मयाचारी व्ही एस, पर्यवेक्षक श्रीमती कोळी, जे एन साहित्यिक सोपान पवार उपस्थित होते. साहित्यिक सोपान पवार यांनी आपले विचार व्यक्त करताना मानवी हक्काचे महत्व प्रतिपादित केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. त्यानिमित्त शताब्दी वर्षे सध्या साजरे केले जात आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील रूढी,परंपरा, चालीरीती, नाकारून नव्या समाजाची जडणघडण केली. देशाच्या ,समाजाच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महान असे कार्य केले आहे .पाणी हे निसर्गाची देणगी आहे .पृथ्वीवरील सर्व मानव जातीचा समान अधिकार आहे. रूढी ,परंपरा ,चालीरीती यांच्या विळाख्यात अडकलेल्या समाजाला त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून त्याच्यात परिवर्तन करून समाजात समानता निर्माण करण्याचे महान कार्य त्यांनी केले .हा सत्याग्रह लढा केवळ पाण्यासाठी नसून मानवी मूलभूत हक्कासाठी आणि माणसाच्या आत्मसन्मानासाठी दिलेला ऐतिहासिक लढा होता . समाजात सर्वधर्मसमभाव हे मूल्य समाजात रुजले पाहिजे असे त्यांनी आपले विचार व्यक्त केले . या कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रशालेत विद्यार्थ्यासाठी निबंध लेखन स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पायाभूत सुविधांचा अभाव, आरोग्य सेवा अपुरी; तातडीने ठोस उपाययोजनांची मागणी**

## वज्रेश्वरी-अकलोली-गणेशपुरी तीर्थक्षेत्र विकास रखडला; शासनाच्या दुर्लक्षामुळे भाविकांची गैरसोय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

वज्रेश्वरी, अकलोली व गणेशपुरी या प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांच्या विकासाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, शासनाच्या दुर्लक्षामुळे या भागातील पायाभूत सुविधांची गंभीर कमतरता जाणवत आहे. परिणामी भाविक व पर्यटकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, या संपूर्ण तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी वज्रेश्वरी देवस्थानचे माजी अध्यक्ष व माजी उपसरपंच अविनाश राऊत यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे केली आहे. श्री वज्रेश्वरी योगिनी देवी मंदिर हे महाराष्ट्रातील एक जागृत शक्तीपीठ म्हणून ओळखले जाते. नवरात्रोत्सवासह विविध धार्मिक उत्सवांदरम्यान येथे देशभरातून हजारो भाविकांची गर्दी होते. याशिवाय, परिसरातील नैसर्गिक गरम पाण्याचे झरे हे पर्यटनाचे प्रमुख आकर्षण आहे. मात्र, वाढत्या भाविकसंख्येच्या तुलनेत आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने या क्षेत्राचा विकास खुंटला आहे.

निवेदनानुसार, २००४ साली 'क्रिट' (उठखढ) संस्थेने ज्येष्ठ वास्तुविशारद चंद्रशेखर प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली या तीन गावांचा प्राथमिक विकास आराखडा तयार करून १३ जुलै २००४ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला होता. मात्र, या अहवालावर आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे हा अहवाल पुन्हा मागवून त्यावर सखोल चौकशी करून अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. वज्रेश्वरी येथे राष्ट्रीय आरोग्य अभियान (छक्ठच्) अंतर्गत मोठी रुग्णालय इमारत उभारण्यात आली असली तरी तेथे डॉक्टर, बालरोगतज्ञ व स्त्रीरोगतज्ज्ञांची कमतरता आहे. या आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात २५ महसुली गावे येत असल्याने त्याला 'ग्रामीण रुग्णालय' दर्जा देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, मुख्यमंत्री पेयजल योजनेअंतर्गत मंजूर पाणीपुरवठा योजना निधीअभावी संथ गतीने सुरू असून सध्या ती स्थगित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. वज्रेश्वरी गाव 'इनाम वर्ग-३' मध्ये येत असल्याने येथील जमिनींचे बिगरशेती (छ) रूपांतर होत नाही. त्यामुळे कायदेशीर बांधकामे व व्यावसायिक विकासास अडथळे निर्माण होत आहेत. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी शासनाने स्वतंत्र धोरण आखण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. या भागात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी रस्त्यांचा अभाव, अतिक्रमणामुळे प्रवासात अडथळे, बसस्थानक व रिक्षा थांबे यांची अपुरी व्यवस्था, पार्किंगची कमतरता, अखंड व दर्जेदार वीजपुरवठ्याचा अभाव, तसेच गरम पाण्याच्या कुंडांची स्वच्छता व आधुनिकीकरणाची गरज या प्रमुख समस्यांकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. इतिहासाच्या दृष्टीने महत्त्व असलेले श्रीमंत चिमाजी अप्पांनी बांधलेले हे मंदिर आणि येथील नैसर्गिक गरम पाण्याचे झरे ही राज्याची अमूल्य देणगी असतानाही, सरकारी अनास्थेमुळे या पर्यटन स्थळाचा अपेक्षित विकास झालेला नाही, अशी खंत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

> **२००६ पासून मी सातत्याने मुख्यमंत्र्यांकडे पत्र व्यवहार करून या समस्या मांडत आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस दखल घेतली गेलेली नाही. या पवित्र क्षेत्राचा विकास झाल्यास भाविक व पर्यटकांना मोठा दिलासा मिळेल.**
> **- अविनाश राऊत, मा. उपसरपंच वज्रेश्वरी.**

